

रोटरी क्लब ऑफ पुणे मिडटाऊनतर्फे दिला जाणारा 'रोटरी सेरा पुरस्कार' बुधवारी पुण्यात कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते गिरीश प्रभुणे यांना प्रदान करण्यात आला. या वेळी (डावीकडे) प्रा. ना. स. फरांदे, तर (उजवीकडे) अनंत खर्चे.

वृत्त पान ४

# वसतिगृह सुधारणांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) : पुणे विद्यापीठातील वसतिगृहांतील असुविधांबाबत विद्यार्थी व विद्यार्थिनींनी काही महिन्यांपूर्वी उत्स्फूर्तपणे केलेल्या आंदोलनाचे पडसाद यंदाच्या विद्यापीठाच्या अधिसभा बैठकीतही उमटणार आहेत.

तीन दिवसांवर येऊन ठेपलेल्या अधिसभा बैठकीसाठी प्रा. अशोक आगरकर यांनी वसतिगृहातील सुविधांसंदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या प्रश्नाला प्रा. डॉ. दिलीप उके यांनी दिलेली उत्तरे समाधानकारक तर नाहीतच परंतु जुजबी स्वरूपाची आहेत, अशी भूमिका काही अधिसभा सदस्यांनी घेतलेली आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा रंगणार असल्याची चिन्हे आहेत.

काही महिन्यांपूर्वी विद्यापीठ वसतगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी असुविधांनी त्रस्त होऊन रस्त्यावर उतरून मध्यरात्री आंदोलन केले होते. वसतिगृहातील अस्वच्छता, पाण्याचा अपुरा पुरवठा, कचऱ्याची समस्या व अन्य सुविधांविषयी विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केले होते. दोन दिवसांनंतर विद्यार्थिनींनीही या विषयी आंदोलन करून त्यांच्या समस्यांना वाचा फोडली होती. या प्रकरणाची कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी दखल घेऊन विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संवाद साधला होता. विद्यार्थ्यांच्या समस्या तत्काळ दूर केल्या जातील व जास्तीत जास्त चांगल्या सुविधा पुरवल्या जातील, असे आश्वासनही दिले होते. कुलगुरूंनी विद्यार्थी भेटीमध्ये वसतिगृहातील स्वच्छता, पाणी व वीज तसेच आधुनिक वसतिगृह व अन्य सुधारणांचे आदेश दिले होते.

**पुणे विद्यापीठ अधिसभा**

प्रश्नोत्तरांमध्ये प्रा. उके यांनी दिलेल्या उत्तरावरून तरी विद्यार्थ्यांच्या समस्या संपल्या आहेत आणि पुरेशा सुधारणा करण्यात आल्या आहेत असे स्पष्ट होत नाही. वसतिगृहासंदर्भात गेल्या वर्षभरात तब्बल ४५० ते ५०० तक्रारी आल्या आणि त्यांचे त्वरित निराकरण करण्यात आले आहे असा खुलासा करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी काय पावले उचलण्यात आली, या प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले आहे, की मुलांचे वसतिगृह एक ते सात येथे बाथरूममध्ये दरवाजे बसवून झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या तक्रारीनुसार सुतारकामे होत आहेत. बाथरूमच्या दरवाजामागे हुक्स बसवण्यात आले आहेत. बाथरूममध्ये आरसे बसवण्यात आले आहेत.

वसतिगृहात स्वच्छता, पाणी व वीज या संदर्भात मात्र कोणती कार्यवाही करण्यात आली आहे याचे स्पष्टीकरण मात्र उत्तरात होत नसल्याने त्यावर अधिसभेत चर्चा रंगण्याची चिन्हे आहेत.

## आम्हाला हवा बोलण्याचाही भत्ता...!

सभेत उपस्थित असणाऱ्या अधिसभा सदस्यांना ज्याप्रमाणे प्रवासभत्ता, दैनंदिन भत्ता, बैठक भत्ता, स्थानिक भत्ता इ. दिला जातो त्याप्रमाणे बोलणे भत्ताही (स्पिकिंग अलाऊन्स) देण्यात यावा, असा ठराव अधिसभा सदस्य प्रा. वसंत निकम यांनी अधिसभेसाठी मांडलेला आहे. विद्यापीठ अधिसभा या संदर्भात काय निर्णय घेते याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

लोकमत 27/3/08

# बुद्धधम्मांच्या पैलूंची सार्थकता सिद्ध करणे आवश्यक -कुलगुरू नरेंद्र जाधव

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी)- बुद्धधम्मांच्या वेगवेगळ्या पैलूंची सद्यस्थितीतील सार्थकता सिद्ध करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

पुणे विद्यापीठाच्या पाली विभागाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. डॉ. जाधव म्हणाले, संशोधनाची व्याख्या वेगवेगळ्या पद्धतीने केली जाते. एका अभ्यासकाने संशोधनाची व्याख्या करताना 'संशोधन म्हणजे अंधाऱ्या खोलीत एखादी काळी मांजर शोधण्यासारखे आहे. ती त्या खोलीत आहे की, नाही हेही माहीत नाही' असे म्हटले आहे. त्यामुळे संशोधन क्षेत्रात नवीन असणाऱ्यांसाठी संशोधन पद्धतीवरील चर्चासत्राचे अतिशय महत्त्व आहे.

पाली विभागाने तयार केलेल्या पुस्तकांचे व दृकश्राव्य फितींचे प्रकाशनही डॉ. जाधव यांच्या हस्ते यावेळी झाले. विभाग प्रमुख प्रा. महेश देवकर यांनी स्वागतपर भाषणात विभागाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे त्यांनी या विभागाला भविष्यात बौद्ध केंद्र म्हणूनही विकसित करण्याचा मनोदय व्यक्त केला. प्रा. एस. के. पाठक यांचे बीजभाषण यावेळी झाले. आपल्या भाषणात त्यांनी बौद्धविद्येची संशोधन पद्धती आणि प्रक्रिया सविस्तर समजावून सांगितली.

प्रभात 29/3/08.

# 'कमवा व शिका' योजनेचे काम संबंधित विभागाप्रमुखामार्फत

पुणे, दि. ३० (प्रतिनिधी)- पुणे विद्यापीठाच्या 'कमवा व शिका' योजनेच्या अंमलबजावणीचे काम यापुढे संबंधित विभागप्रमुखांमार्फत करण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या महिन्यामध्ये 'कमवा व शिका' या योजनेबाबत विद्यापीठात बरेच वादंग झाले होते. यासंदर्भात कुलगुरूंनी शब्बीर शहा समितीचे गठण केले होते. या समितीने नुकताच आपला अहवाल कुलगुरूंना सादर केला. यातील सूचनांचा विचार करून त्यांनी हा निर्णय घेतला आहे. यापुढे योजनेच्या समन्वयाचे काम कक्षाधिकारी सचिन सुर्वे हे पाहतील. या समन्वयामध्ये जर त्यांना अडचणी आल्या, तर त्यासाठी कुलसचिव त्यांना मदत करतील, असेही कुलगुरूंनी सांगितले.

विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका' या योजनेबद्दल काही अडचणी आल्यास त्यांनी त्या कुलसचिवांमार्फत समुपदेशन समितीपुढे मांडण्याची सोय विद्यापीठाच्या वतीने करण्यात आली आहे. जर त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही, तर विद्यार्थ्यांना स्वतः माझ्याशी चर्चा करता येईल, असेही कुलगुरूंनी स्पष्ट केले.

पुण्यनगरी 31/3/08